महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

जा.क्र. : काऔसंवि/ब/कर्कानिस/५१वी बैठक/२००८५ दिनांक : २७/०६/२०११

## परिपत्रक

विषय : कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५१ व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

*************

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीची ५१ वी बैठक दि. १६/०६/२०११ रोजी हाँगकाँग बँक इमारत, फोर्ट, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) एकाच कर्मचाऱ्याकडून त्याच अवलंबिताच्या आजारासाठी सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये एकापेक्षा जास्त वेळा आर्थिक मदत मिळण्याबाबतचे प्रस्ताव सांघिक कार्यालयास प्राप्त होतात. सदर प्रकरणी कर्मचाऱ्याच्या एका अवलंबिताच्या आजारासाठी फक्त एकाच वेळेस आर्थिक मदत मंजूर करण्यात येईल. तसेच सदर कर्मचाऱ्याने त्याच अवलंबिताच्या आजारासाठी दुसऱ्यांदा अर्ज केल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

२) ज्या कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना कर्मचारी निवृत्ती वेतन योजना अधिनयम १९९५ च्या अधिन राहून निवृत्ती वेतन मिळते अशा कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना सुध्दा कर्मचारी कल्याण निधीमधून आर्थिक मदत देण्यात येईल, सदर निर्णयाची अंमलबजावणी परिपत्रक प्रसारित झाल्याच्या तारखेपासून करण्यात येईल.

३) कंपनीत नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पहिल्या पगारातून कर्मचारी कल्याण निधीचे रु. १०/- कपात झाल्यानंतर पुढील महिन्यापासून त्यांना कर्मचारी कल्याण निधीमधून आर्थिक मदत मिळण्याबाबतचा लाभ सुरु करण्यात येईल. सदर निर्णयाची अंमलबजावणी परिपत्रक प्रसारित झाल्याच्या तारखेपासून करण्यात येईल.

४) कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे आर्थिक मदत देण्यात येणाऱ्या आजाराच्या व्यतिरिक्त खालीलप्रमाणे ०२ आजाराचे गांभीर्य व उपचारास्तव रुग्णालयात दाखल केले असल्याने येणारा खर्च विचारात घेऊन त्या आजारांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी परिपत्रक प्रसारित झाल्याच्या तारखेपासून करण्यात येईल.

| अ.क्र. | आजाराचे नाव | कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे देण्यात येणारी आर्थिक मदत |
|---|---|---|
| १. | Swine flue (Hospital Admission only) | Upto Rs. 10.000/- |
| २. | Hepatitis - A (Jaundice) (Hospital Admission only) | Upto Rs. 10.000/- |

५) तत्कालीन म. रा. वि. मंडळातील व आताच्या तिन्ही वारस कंपन्यातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्तीचे वितरण भौगोलिकदृष्ट्या ०९ परिमंडळ निहाय करण्यात येत होते. आता तिन्ही कंपन्यातील कर्मचाऱ्यांची संख्या व भौगोलिक परिक्षेत्रानुसार कार्यालये / विद्युत केंद्र विचारात

घेवून खालील प्रमाणे एकूण १२ परिमंडळनिहाय शिष्यवृत्तीची तरतूद करण्यात आली आहे. सदर शिष्यवृत्तीची अंमलबजावणी सन २०११-१२ या शैक्षणिक सत्रापासून करण्यात येईल.

| अ.क्र. | परिमंडळाचे नाव | भौगोलिक दृष्ट्या परिमंडळांतर्गत येणारे कार्यालये / विद्युत केंद्र | शिष्यवृत्तींची संख्या |
|---|---|---|---|
| १. | सांघिक कार्यालय, मुंबई (भांडूप नागरी परिमंडळासह) | १) सां.का., प्रकाशगड (महावितरण)<br>२) सां.का., प्रकाशगंगा (महापारेषण)<br>३) सां.का., प्रकाशगड (महानिर्मिती)<br>४) भांडूप परिमंडळ (महावितरण)<br>५) वाशी अउदा परिमंडळ (महापारेषण) (राज्य भार प्रेषण केंद्रासहित) (अउदा पनवेल, एचव्हीडीसी, पडघे मंडल व अंबाझरी भार प्रेषण केंद्र, वगळून) | ६० |
| २. | कल्याण परिमंडळ (कोंकण परिमंडळ, रत्नागिरीसह) | १) कल्याण परिमंडळ (महावितरण)<br>२) कोंकण परिमंडळ (महावितरण)<br>३) वायु विद्युत केंद्र, उरण (महानिर्मिती) (१०४० मे.वॅ. प्रकल्पासहीत)<br>४) जल वि.केंद्र, पोफळी (महानिर्मिती)<br>५) पनवेल अउदा मंडल (महापारेषण)<br>६) पडघे एचव्हीडीसी मंडल (महापारेषण) | ८० |
| ३. | अमरावती परिमंडळ | १) अमरावती परिमंडळ (महावितरण)<br>२) अमरावती अउदा परिमंडळ (महापारेषण)<br>३) औष्णिक विद्युत केंद्र,पारस (महानिर्मिती) | ८० |
| ४. | नाशिक परिमंडळ | १) नाशिक परिमंडळ (महावितरण)<br>२) नाशिक अउदा परिमंडळ (महापारेषण) (खडका (भुसावळ) अउदा मंडल वगळून)<br>३) औ.वि.केंद्र, एकलहरे (महानिर्मिती)<br>४) जल वि.केंद्र, पैठण, एलदरी, वैतरणा व घाटघर (महानिर्मिती) | ८० |
| ५. | जळगाव परिमंडळ | १) जळगाव परिमंडळ (महावितरण)<br>२) औ.वि.केंद्र, भुसावळ (महानिर्मिती)<br>३) खडका (भुसावळ) अउदा मंडल (महापारेषण) | ८० |
| ६. | कोल्हापूर परिमंडळ | १) कोल्हापूर परिमंडळ (महावितरण)<br>२) कराड अउदा परिमंडळ (महापारेषण) | ८० |
| ७. | पुणे परिमंडळ | १) पुणे परिमंडळ (महावितरण)<br>२) पुणे अउदा परिमंडळ (महापारेषण) | ६० |
| ८. | बारामती परिमंडळ | १) बारामती परिमंडळ (महावितरण)<br>२) जल वि.केंद्र, विर, भाटघर, पवना, पानशेत व किल्लारी (महानिर्मिती) | ६० |
| ९. | औरंगाबाद परिमंडळ (नांदेड परिमंडळासह) | १) औरंगाबाद परिमंडळ (महावितरण)<br>२) नांदेड परिमंडळ (महावितरण)<br>३) औरंगाबाद अउदा परिमंडळ (महापारेषण) ( परळी वैद्यनाथ अउदा मंडल वगळून) | ८० |
| १०. | लातूर परिमंडळ | १) लातूर परिमंडळ (महावितरण)<br>२) औष्णिक वि. केंद्र, परळी (महानिर्मिती)<br>३) परळी वैद्यनाथ अउदा मंडल (महापारेषण) | ६० |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | नागपूर शहर परिमंडळ | १) नागपूर शहर परिमंडळ (महावितरण)<br>२) औष्णिक वि. केंद्र, कोराडी (महानिर्मिती)<br>(स्था. II कोराडी, चाचणी टी आय अॅन्ड सी, नागपूर व कोराडी निर्मिती प्रकल्प -II सहीत)<br>३) औष्णिक वि. केंद्र, खापरखेडा (महानिर्मिती) | ८० |
| १२. | नागपूर परिमंडळ | १) नागपूर परिमंडळ (महावितरण)<br>२) नागपूर अउदा परिमंडळ (महापारेषण) (अंबाझरी भार प्रेषण केंद्रसहीत)<br>३) औष्णिक वि. केंद्र, चंद्रपूर (महानिर्मिती) | ८० |
| | | **शिष्यवृत्तीची एकूण संख्या -** | ८८० |

६) अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियत्रंण मंडळाच्या क्रीडास्पर्धेत भाग घेवून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक (सुवर्णपदक, रौप्यपदक व कास्यपदक) मिळविणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना जी रोख पारितोषीके (वैयक्तिक व सांघिक स्पर्धेसाठी) देण्यात येतात त्या रकमेत खालील प्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे. हा निर्णय अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियत्रंण मंडळाच्या क्रीडास्पर्धा सन २०१०-११ पासून अंमलात आणण्यात येईल.

| प्राविण्याचा तपशिल | मंजूर करण्यात आलेली रोख पारितोषिकाची रक्कम |
|---|---|
| **वैयक्तिक स्पर्धेत प्राविण्य** | |
| १) प्रथम क्रमांक (सुवर्णपदक) | रु.५,०००/- |
| २) द्वितीय क्रमांक (रौप्य पदक) | रु.४,०००/- |
| ३) तृतिय क्रमांक (कास्य पदक) | रु.३,०००/- |
| **सांधिक स्पर्धेत प्राविण्य** | |
| १) प्रथम क्रमांक (सुवर्णपदक) | रु.२,०००/- |
| २) द्वितीय क्रमांक (रौप्य पदक) | रु.१,५००/- |
| ३) तृतिय क्रमांक (कास्य पदक) | रु.१,०००/- |

किशोर पवार

**सदस्य / सचिव, क.क.नि.समिती तथा**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रत सविनय सादर :

१) संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित, प्रकाशगड, बांद्रे, मुंबई.

२) कार्यकारी संचालक (मासं), महावितरण, महानिर्मिती / महापारेषण.

प्रत सस्नेह :

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण.

-- आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या कंपनी अंतर्गत उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

प्रत :

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.

D:\old d drive madhuri SWEC 51 baithak avojan doc